# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः30.09.2025** **वारःमंगळवार**

---

1. भारत भूतान दरम्यान रेल्वेसेवा सुरू होणार
2. पशुधनात वार्षिक 12 टक्के वाढ झाल्याची केंद्रिय मंत्र्यांची माहिती
3. अमेरिकेकडून गाझा शांतता नियोजन आराखडा प्रकाशित
4. अमेरिकेच्या आयातकर वाढीत आता चित्रपटांचाही समावेश आणि
5. महिलांच्या आयसीसी विश्वकरंडक स्पर्धेला आजपासून सुरुवात

**वैष्णव-भूतान**

भारत आणि भूतान दरम्यान, दोन रेल्वे गाड्या सुरू करण्याबाबत काल सहमती झाली. दिल्लीत संयुक्त वार्ताहर परिषदेत बोलताना रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी, भूतानची गेलेफू आणि समत्से या दोन शहरांना जोडणाऱ्या रेल्वे, आसामच्या कोकराझार आणि पश्चिम बंगालच्या बानरहाट इथून सुटतील अशी माहिती दिली. या प्रकल्पांसाठी एकंदर साडेचार हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, भारत संपूर्ण गुंतवणूक करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. भारत हा भूतानचा सर्वांत मोठा विकास सहाय्य पुरवठादार असून, भूतानच्या आधुनिकीकरणात आणि पायाभूत क्षेत्रासह एकंदर आर्थिक विकासात भारताची महत्त्वाची भूमिका असल्याचं परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी यावेळी सांगितलं.

**भारत-भूतान चर्चा**

परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री आणि भूतानचे विदेश सचिव ओम पेमा चोडेन यांच्यातही काल नवी दिल्लीत द्विपक्षीय चर्चा झाली. उभय देशांनी परस्पर संबधांचा आढावा घेतला आणि प्रमुख सहकार्य क्षेत्रांतील प्रगतीविषयी चर्चा केली असं परराष्ट्र मंत्रालयानं निवेदनाद्वारे सांगितलं. भारत-भूतान संयुक्त ऊर्जा भागीदारीच्या दृष्टीकोनातून महत्त्वाच्या असलेल्या एक हजार वीस मेगावॅट क्षमतेच्या पुनत्सांगछू-2 जलविद्युत प्रकल्पाची सर्व सहा युनिटस् यशस्वीरित्या कार्यान्वित झाल्याचंही या निवेदनात म्हटलं आहे.

**पशुधन**

पशुधन क्षेत्रात गेल्या काही वर्षांत वार्षिक 12 टक्के वाढ झाल्याची माहिती केंद्रिय मत्स्य व्यवसाय, पशुपालन आणि दुग्धव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंग यांनी दिली आहे. यामुळे कृषीपूरक व्यवसायांच्या मूल्यवृद्धीत 31 टक्के वाढ झाली असून देशाच्या अर्थव्यवस्थेतही 5 टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाल्याचं त्यांनी सांगितलं. शाश्वत पशुधन रुपांतरण याविषयीच्या दुसऱ्या जागतिक परिषदेत ते काल इटलीमध्ये बोलत होते. भारत दुग्धोत्पादनात जगात आघाडीवर आहे. पशुधनाच्या लसीकरणाचं राष्ट्रीय गोकुळ अभियान, भारत पशुधन डिजिटल ओळख आणि महिलांच्या नेतृत्वातील सहकारी पशुपालन व्यवसाय यासारखे बदल घडवून आणणारे आणि सर्वसमावेशक उपक्रम भारतात सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

**जयशंकर**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल कॅनडाच्या परराष्ट्र मंत्री अनिता आनंद यांची न्यू यॉर्क इथं भेट घेतली. दोन्ही देशांमधले संबंध पुन्हा सुरळीत करण्याच्या दृष्टीनं ही भेट महत्त्वाची मानली जात आहे. संयुक्त राष्ट्रांच्या 80 व्या सर्वसाधारण सभेच्या पार्श्वभूमीवर जयशंकर यांनी संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस एँटोनिओ गुटेरस, सौदी अरेबियाचे परराष्ट्र मंत्री फैसल बिन फरहान यांच्याशी संवाद साधला. विकासाच्या केंद्रस्थानी-मदत, व्यापार आणि तंत्रज्ञान या विषयावरच्या चर्चासत्रातही जयशंकर सहभागी झाले होते. तंत्रज्ञान, बहु ध्रुवीकरण, आत्मनिर्भरता आणि दक्षिणेकडील देशांचं सहकार्य ही जगात सध्या घडणाऱ्या घडामोडींवरची प्रतिक्रिया आहे असं मत जयशंकर यांनी यावेळी व्यक्त केलं.

**जलशक्ती**

गंगा संवर्धन हा केवळ एक पर्यावरण उपक्रम नसून तो देशाचा सांस्कृतिक वारसा, श्रद्धेशी निगडीत आहे तसंच लाखो लोकांचं जीवन गंगेवर अवलंबून आहे असं केंद्रिय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी म्हटलं आहे. गंगा पुनरुज्जीवन अधिकृत कृती दलाच्या 16 व्या बैठकीत ते काल नवी दिल्लीत बोलत होते. या बैठकीत नियामावली आणखी कठोर करणे तसंच पूररेषा निश्चित करणे यावरही चर्चा करण्यात आली.

**राजनाथ सिंह**

निवृत्तीनंतरही राष्ट्र उभारणीत योगदान देणाऱ्या माजी लष्करी कर्मचाऱ्यांचा काल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. निवृत्त लष्करी कर्मचारी आपल्या देशकार्यातून पुढच्या पिढ्यांना देशसेवेची प्रेरणा देत आहेत असं संरक्षण मंत्री यावेळी म्हणाले. विकसित भारत-माजी सैनीक कल्याण या संकल्पनेवरील पहिली राष्ट्रीय परिषद काल नवी दिल्लीत सुरू झाली. या परिषदेत ते बोलत होते. सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान आणि लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यावेळी उपस्थित होते. संरक्षण मंत्रालयाच्या माजी सैनिक कल्याण विभागानं ही दोन दिवसांची परिषद आयोजित केली आहे.

**जीएसटी खेळणी**

वस्तू आणि सेवा कर सुसुत्रीकरणाचा फायदा लहान मुलांची खेळणी तसंच क्रीडा संबंधित वस्तूंनाही झाला आहे. या सर्वांवरील कर 12 टक्क्यांवरून 5 टक्क्यांवर आला आहे. यामुळे क्रीडा साधनांच्या किंमती कमी होणार असल्यानं, आरोग्य उपक्रमांना प्रोत्साहन मिळणार असून, तळागाळातील प्रतिभावंत खेळाडूंची प्रतिभा उंचावण्यास मदत होणार आहे. खेळणी आणि क्रीडा उपकरणांमधील स्वदेशी उत्पादकांनाही याचा फायदा होईल. विशेषतः लघु आणि मध्यम उद्योगांमध्ये देशांतर्गत तसंच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धात्मकता वाढीस लागणार आहे. याचा फायदा सायकलवरील कर कमी होण्यामध्ये झाला असून, त्यामुळे पर्यावरणपूरक वाहतुकीला चालना मिळू शकेल.

**ट्रम्प-नेतान्याहू**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इस्राइलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्यात झालेल्या बैठकीनंतर काल अमेरिकेनं गाझा पट्टीत शांतता स्थापन करण्याबाबतचा नियोजन आराखडा प्रकाशित केला. गाझा पट्टीला दहशतवादमुक्त करुन तिथल्या लोकांच्या फायद्यासाठी या भागाचा पुनर्विकास केला जाईल. दोन्ही बाजूंनी या प्रस्तावाला मान्यता दिल्यास युद्ध तत्काळ थांबवण्यात येईल असं या आराखड्यात म्हटलं आहे. हा प्रस्ताव स्वीकारल्यानंतर सर्व लष्करी कारवाया थांबवून सैन्य मागं घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल तसंच परस्परांच्या ताब्यात असलेल्या ओलिसांनाही मुक्त केलं जाईल.

हमासच्या सदस्यांनाही गाझा पट्टी सोडण्यासाठी मदत केली जाईल आणि कोणत्याही अडथळ्याविना गाझा पट्टीत संयुक्त राष्ट्रं तसंच इतर संस्थांची मदत पोहोचवली जाईल असं या शांतता प्रस्तावात म्हटलं आहे.

**ट्रम्प-टेरिफ**

अन्य उत्पादनांनतर आता इतर देशांत तयार झालेल्या चित्रपटांवरही शंभर टक्के आयातकर लावण्याचा निर्णय अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल जाहीर केला. गेल्या मे महिन्यात ट्रम्प यांनी चित्रपटांवर आयातशुल्क लावण्याचे अस्पष्ट संकेत दिले होते. अमेरिकेबाहेरच्या सहनिर्मितीला आणि आंतरराष्ट्रीय चित्रपट महसूल संकलनाला यामुळे फटका बसण्याची शक्यता आहे.

**कॅनडा बिष्णोई**

कॅनडाने बिश्नोई समूहाला फौजदारी संहितेअंतर्गत दहशतवादी संघटना म्हणून सुचीबद्ध केले आहे. या कारवाईमुळे, कॅनडाच्या कायदा अंमलबजावणी संचालनालयामार्फत या गटाची मालमत्ता, वाहने, संपत्ती जप्त केली जाऊ शकते. त्यामुळे समूहाला होणारा वित्तपुरवठा, प्रवास आणि नवी भरती यांसंदर्भातल्या दहशतवादी गुन्ह्यांवर कारवाई करता येणार आहे. विविध गुन्हेगारी कृत्यांमध्ये गुंतलेल्या या समूहाकडून खंडणी वसूल करणे आणि धमकी देत दहशत निर्माण करणे अशा स्वरुपाचे गुन्हे होत असल्याचं कनडानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

**धम्मचक्र प्रवर्तन-नागपूर**

एकोणसत्तराव्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आजपासून नागपूर मधल्या दीक्षाभूमीवर कार्यक्रम सुरू होत आहेत. भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई आज बौद्ध धम्माची दीक्षा देणार आहेत. तसंच देश परदेशातील बौद्ध भिक्खूंच्या उपस्थितीत धम्म परिषदही होणार आहे. 2 ऑक्टोबरला धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी लाखों अनुयायी नागपूरमध्ये येतात. त्या पार्श्वभूमीवर नांदेड-नागपूर आणि पुणे नागपूर अशा दोन विशेष रेल्वेगाड्या सोडण्याचा निर्णय दक्षिण मध्य रेल्वेनं घेतला आहे.

**महिला क्रिकेट**

आयसीसी महिला विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेला आजपासून सुरुवात होत आहे. 50 षटकांच्या सामन्यांच्या या स्पर्धेतला पहिला सामना आज भारत आणि श्रीलंका संघांमध्ये गुवाहाटी इथं खेळला जाईल. भारत आणि श्रीलंका या यजमान देशांसह ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, न्यूझीलंड, दक्षिण अफ्रिका, बांग्लादेश आणि पाकिस्तानच्या महिला संघांमध्ये प्राथमिक फेरीचे 28 सामने होतील.

# आकाशवाणी पुणे केंद्राचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.